मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशीतील मानाच्या विड्याला 25 लाखांची बोली

## दीड कोटींच्या लिलावाची बोली चालली सात तास : शेकडो ग्रामस्थांची उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात मानाच्या विड्याच्या लिलावासाठी लाखोंची बोली लावण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या श्री नागेश्वर महाराज भंडारा उत्सवातील लिलावामध्ये या वर्षीच्या मानाच्या विड्याला तब्बल २५ लाख रुपयांची बोली लावली गेली. हा विडा मोशीतील जगदीश श्रीपती जाधव-सस्ते यांनी घेतला.

श्री नागेश्वर महाराज यांचा आशिर्वादच जणू आपणास मिळाला आणि या आशिर्वादानेच आपले कुटुंब व मोशी ग्रामस्थ सुखी आहेत. त्यामुळेच आपण हा विडा घेतला असल्याची प्रतिक्रीया यावेळी जगदीश श्रीपती जाधव-सस्ते यांनी दिली. तर मानाची ओटी रोहीदास विष्णू घिगे (हवालदार) १७ लाख५२ हजार, आकाश विष्णू सस्ते मानाचे शेवटचे लिंबू ११ लाख १ हजार १०१,



लिलावाची सुरुवात ज्या विड्याने झाली तो मानाचा पहिला विडा भालचंद्र बोराटे ७ लाख ५१ हजार रूपये, पहिले लिंबू संभाजी बबन बोऱ्हाडे १ लाख ७१ हजार रूपयांना घेतले.

देवाच्या दारात पैशाला मोल नाही हेच खरं, याचा प्रत्यय करून देणारा हा लिलाव आहे. त्या लिलावात सुरुवातीपासून शेवटपर्यंत बसणाऱ्याला हे हमखास जाणवतं. 'नागेश्वर महाराजांच्या सानिध्यातील वस्तू, प्रसाद घेईल त्याला भरभराट' या अशा शब्दात व भारदस्त आवाजात उत्सवातील

### दीड कोटींच्या लिलावाची बोली चालली सात तास

**» सकाळी दहा वाजल्यापासून शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत मोशीतील ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज मंदीर येथे भंडाऱ्यातील विविध वस्तूंचा लिलाव सुरु होता. सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत हा लिलाव सुरु होता. सुमारे १ कोटी ४६ लाख रूपयांचा लिलाव करण्यात आला.**

लिलावात पुकार करण्याचे काम केदारी कुटुंबातील नारायण निवृत्ती केदारी, सागर नारायण केदारी हे करत होते.

**या वस्तूंचा होतो लिलाव..**

दरवर्षी या लिलावामध्ये भाविकांना अर्पण केलेल्या सोन्या चांदीच्या वस्तूंचा व भंडाऱ्यातील प्रसाद व लिंबू अशा वस्तूंची बोली लावून लिलाव केला जातो. ग्रामस्थांकडून भंडाऱ्यातील महाप्रसाद बनविण्याची भांडी दरवर्षी नव्याने खरेदी केली जातात. मानाची ओटी आणि मानाचे लिंबू हे लिलावातील महत्ताचे मानले जाते.

केदारी यांचा यंदा ग्रामस्थांच्यावतीने उभा पोशाख, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. उत्सवातील वस्तूंचा लिलाव हा पंचक्रोशीतील भाविकांच्या दृष्टीने एक विशेष पर्वणीचा सण असतो. त्यामुळे लिलाव पाहण्यासाठी सभा मंडपामध्ये भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. आता यंदादेखील या मानाच्या विड्याची पंचक्रोशीत चर्चा सुरू झाली आहे.

---

# पिंपरी-चिंचवडकरांचा अभिमान 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' चे पाद्यपूजन

## तमाम शिव-शंभू प्रेमींच्या संकल्पाची अखेर पूर्तता : आमदार महेश लांडगे यांची संकल्पना

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. राज्यातील शिव-शंभू प्रेमी युवकांचे प्रेरणास्थान म्हणून नावारुपाला येणाऱ्या या "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" चे पाद्यपूजन आज विधीवत करण्यात आले.

भारतीय जनता पार्टीचे नेते तथा प्रखर हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून बोऱ्हाडेवाडी- मोशी येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा उभारण्याचे काम सुरू आहे. या पुतळ्याच्या चौथऱ्याचे झाले आहे. त्यामुळे पुतळा ज्या ठिकाणी उभारला जणार आहे. त्या ठिकाणी पाद्यपूजन करण्यात आले. यावेळी मोशी-बोऱ्हाडेवाडीतील ग्रामस्थ यांच्यासह शिव-शंभू विचारांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' अर्थातच छत्रपती संभाजी महाराज यांचा सर्वात उंच पुतळा उभारण्याचे भाग्य लाभले, याचे समाधान वाटते.



> धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा अर्थात 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'चे काम प्रगतीपथावर आहे. महाराजांच्या पुतळ्याचे पाद्यपूजन करण्यात आले. योगायोगाने आजपासूनच आपल्या राजाचा बलिदान मास सुरू होतो आहे. "देव-देश अन् धर्मासाठी मरावे कसे..?" याची शिकवण देणाऱ्या महाराजांचे कार्य अजरामर आहे. चंद्र-सूर्य असेपर्यंत या कार्याची महती कायम राहील. शंभूराजांच्या कार्याची प्रेरणा सदैव या शंभूसृष्टीमधून मिळेल.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा.**

पिंपरी-चिंचवडकरांसह संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटेल, असा भव्य पूर्णाकृती पुतळा साकारत आहे. शंभू सृष्टीसुद्धा आहे. हा पुतळा हिंदू धर्म आणि संस्कृती संरक्षणाची कायम प्रेरणा देत राहील.

**..असा आहे 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'**

छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याची १४० फूट उंची

चौथऱ्यांची उंची ४० फूट

सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा पुतळा १० फूट

सरदार आणि मावळे एकूण १६ पुतळे प्रत्येकी १० फूट

ओपन एअर थिएटर, प्रमुख प्रसंगांवर आधारित ब्राँझ म्यूरल्स

शंभुराजांची गाथा ऐकण्यासाठी एलईडी स्क्रीन

चलचित्र, प्रकाश योजना, हॉलोग्राफिक प्रेझेंटेशन व्यवस्था.

# अतिक्रमण कारवाईचे वेळापत्रक निश्चित!

## 30 दिवसांत रस्ते अतिक्रमणमुक्त करणार : ‘पीएमआरडीए’चा महत्त्वपूर्ण निर्णय




**पुणे | प्रतिनिधी**

शहर आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पुढाकार घेतला असून, ३० दिवसांत रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्धार केला आहे. वाहतूक कोंडी होणाऱ्या विविध भागांत पुढील ३० दिवसांत राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य मार्गाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अनधिकृत आणि अतिक्रमण केलेली दुकाने, गाळे, बांधकामे तसेच अन्य काही तात्पुरत्या स्वरूपाच्या बांधकामांवर विविध विभागांकडून संयुक्त कारवाई होणार आहे. मार्च महिन्यापासून या कारवाईला प्रारंभ होणार आहे.

पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी विविध यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली. त्यामध्ये ३० दिवसांत रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पीएमआरडीएच्या सहआयुक्त दीप्ती सूर्यवंशी-पाटील, अधीक्षक भूमी अभिलेख विभागाच्या आशा जाधव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, पिंपरी चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम आदी या वेळी उपस्थित होते.

**अतिक्रमणे पुन्हा झाली, तर काय?**

अतिक्रमणांवर कारवाई केल्यानंतर संबंधित ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही, यासाठी दक्षता घेण्यासाठी प्रशासनाकडून काही केले जात नसल्याचा पूर्वानुभव आहे. त्यामुळे पुन्हा काही दिवसांतच त्याच ठिकाणी अतिक्रमणे उभी राहतात, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे केवळ कालबद्ध कृतिकार्यक्रम न राबविता ही समस्या कायमस्वरुपी सोडविण्याच्या नागरिकांच्या मागणीचा विचार व्हावा, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

### कोणत्या रस्त्यांवर कारवाई होणार?

**» पुणे सोलापूर रस्त्यावरील हडपसर ते यवत आणि उरुळीकांचन ते शिंदवणे, नाशिक रस्त्यावरील राजगुरूनगर परिसर, चांदणी चौक ते पौड येथील अतिक्रमणांवर ३ मार्च ते १० मार्च या दरम्यान कारवाई होणार आहे. पुणे सातारा रस्त्यावरील नवले पूल ते सारोळे, सूस रस्ता, हडपसर (शेवाळेवाडी) ते दिवेघाट, नवलाख उंब्रे ते चाकण, हिंजवडी परिसर ते माण, तळेगाव-चाकण-शिक्रापूर येथील अतिक्रमणांवर १० मार्च ते २० मार्च या कालावधीत कारवाई करण्यात येणार आहे.**

“ पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सर्व विभाग संयुक्त कारवाई करणार असून, त्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. संबंधित क्षेत्रातील महामार्ग आणि राज्यमार्ग रस्त्यालगतची दुकाने, पत्राशेड, गाळे, टपरी आणि अनधिकृत बांधकामे स्वत:हून काढून टाकावीत.

**- डॉ. योगेश म्हसे, महानगर आयुक्त, पीएमआरडीए.**

# 100 दिवसांच्या उपक्रमात पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अग्रस्थानी

## आयुक्त शेखर सिंह यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान



**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमात पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ही सर्वोत्तम कामगिरी करणारी महापालिका ठरली आहे. राज्यभरातील महापालिकांचे आणि अन्य क्षेत्रीय कार्यालयांचे मूल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने १०० दिवसांचा कृती आराखडा हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाचा मध्यावधी आढावा २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि वरिष्ठ राज्य व क्षेत्रीय प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमात पिंपरी-चिंचवड महापालिकेने केलेल्या सर्वोत्तम कामगिरीमुळे आयुक्त शेखर सिंह यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

महानगरपालिका संचालनालयाने राज्यातील २२ महापालिकांपैकी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सहा महापालिकांची यासाठी निवड केली होती. त्यामध्ये अंतिम मूल्यमापनानंतर पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रथम क्रमांक पटकावला असून ठाणे महानगरपालिकेने दुसरा क्रमांक पटकावला आहे. ई-प्रशासन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छता, अनावश्यक कार्यालयीन कागदपत्रांची विल्हेवाट, नाविन्यपूर्ण कार्यक्रम आणि आधुनिक सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणा केल्याने महापालिकेस हे यश प्राप्त झाले आहे.

**डिजिटल प्रशासन आणि कामकाजामध्ये पारदर्शकता**

दिव्यांगांच्या सोयीसाठी महापालिकेने नव्याने संकेतस्थळ विकसित केले आहे. या संकेतस्थळामुळे रिअल टाईम अपडेट्स, १००% माहितीचा अधिकार आणि नागरी सेवांमध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यास मदत होत आहे. या सेवा अधिक सुलभ करण्यासाठी महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ, डिजी-लॉकर, आपले सरकार पोर्टल आणि आयजीआर संकेतस्थळाचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच संकेतस्थळाच्या सुरक्षितता वाढविण्यासाठी बीटा टेस्टर्सचा देखील वापर केला जात आहे.

महापालिकेने उच्च कार्यक्षमतेचा स्तर गाठला आहे आणि भविष्यातही नागरिकांना दर्जेदार सुविधा पुरविण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमाचे अंतिम पुनरावलोकन एप्रिलमध्ये होणार असून, आम्ही या यशात सातत्य ठेवण्याचा निर्धार केला असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

### सार्वजनिक तक्रार निवारण प्रणालीमध्ये सुधारणा

**» महापालिकेने लोकशाही दिन आणि जनसंवाद सभा यांसारख्या उपक्रमांना तक्रार निवारण प्रणालीशी जोडले आहे. एआय तंत्रज्ञानावर आदारित तक्रार व्यवस्थापन प्रणालीमुळे तक्रारींचे वर्गीकरण, प्राथमिकता आणि निराकरण अधिक प्रभावी झाले आहे. यामुळे सरासरी प्रतिसाद वेळ १५ दिवसांवर आला आहे. गेल्या ५ वर्षांत ३.५ लाख तक्रारींचे एआय आधारित विश्लेषण करून कार्यक्षम प्रशासनावर भर देण्यात आला आहे.**

# वल्लभनगर बस स्थानकातील प्रवाशांची सुरक्षा 'रामभरोसे'

## वल्लभनगर आगारातील चौकीला टाळे, अनेक बस वर्षांनुवर्षे अडगळीत; पुण्यातील घटनेनंतर आगारप्रमुखांना जाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वारगेट येथील बस स्थानकात झालेल्या अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमधील वल्लभनगर बस स्थानकातील अधिकारी खडबडून जागे झाले आहेत. त्यांनी मेट्रो अधिकारी आणि पोलिस यंत्रणेला बुधवारी (दि. २६) पत्र देवून सुरक्षितेसाठी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे एसटी आगारातील अधिकाऱ्यांच्या गलथान कारभार चव्हाट्यावर आला आहे.

वल्लभनगर बस स्थानकात केवळ सात सीसीटीव्ही असून काही कॅमेरे बंद अवस्थेत आहेत. कित्येक वर्षांपासून पोलीस चौकिला टाळे लागलेले असून पोलिस कर्मचारी कधीही येत नाहीत. काही बस अडगळीत पडलेल्या आहेत. या बसचे दारे-खिडक्यादेखील उघड्या दिसत आहे. रात्रभर केवळ तीन सुरक्षारक्षकांवर संपूर्ण आगाराच्या सुरक्षिततेची भिस्त आहे. त्यामुळे वल्लभनगर आगाराची प्रवासी सुरक्षा भगवान भरोसे असल्याचे उघड झाले आहे.

पिंपरी-चिंचवडमधील वल्लभनगर एसटी बस आगाराकडे केवळ ५० एसटी बसचा समावेश आहे. दिवसभरात त्यांच्या ३१ फेऱ्या होतात. तर दिवसभरात विविध आगाराच्या साडेपाचशे एसटी स्थानकात दाखल होतात. सध्या आगाराच्या ताफ्यात जुन्या बस आहेत. एसटी आगारात अन्य भागातून तब्बल २३० बस मुक्कामी येतात. त्या बस चालक-वाहकांना रात्री विश्रामाची सोय आहे. मात्र, बाहेरील आगाराच्या काही बस दररोज वल्लभनगर बस स्थानकांबाहेर रस्त्यावर लावून ठेवल्या जातात. रात्रभर अनेक बस बाहेरच लावल्याने काही अनुचित घटना घडल्यास जबाबदार कोण, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

एसटी बस स्थानकात सोयी-सुविधांचा अभाव दिसून येत आहे. प्रवाशांना पिण्याचे पाणी, उपहारगृह, स्वच्छतागृहात अस्वच्छता, धूळीचे साम्राज्य दिसून येत आहे. काही बस आगाराच्या कार्यशाळेत बंद अवस्थेत आढळून आल्या. काही बस आदळून त्यांची दुरवस्था झालेली आहे. आगारात पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नाही.



### पोलीस कर्मचारी नाही अन् नियंत्रण कक्ष बंद

» वल्लभनगर एसटी आगारात पोलिस चौकी कित्येक वर्षांपासून बंद आहे. त्या पोलिस चौकीचा फलकदेखील काढण्यात आलेला आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून पोलिस कर्मचारीही तैनात केलेला नाही. तसेच पोलिसाची राऊंडही होत नाही. त्यामुळे वल्लभनगर एसटी आगाराकडून पोलिसांना पत्र दिले आहे. त्यात दररोज ५५० बसची ये-जा सुरु असते. बस स्थानकात प्रवाशांच्या गर्दीमुळे मोबाईल, दागिने, पर्स चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. रात्रीच्या वेळी गुंडगिरी वाढली आहे. तळीरामांचा वावर वाढला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बस स्थानकातील पोलिस नियंत्रण कक्षात पोलिस कर्मचाऱ्याची नेमणूक करावी, अशी मागणी आगाराकडून केली आहे.

### मेट्रोला पत्र, सीसीटीव्ही आणि सीमाभिंतीची मागणी

» वल्लभनगर एसटी आगाराने महामेट्रोला संत तुकाराम स्थानकासाठी जागा दिली होती. त्या ठिकाणी महामेट्रोने स्थानक करत पार्किंगचीही सोय केलेली आहे. त्या भागात महामेट्रोकडून सीसीटीव्ही यंत्रणा बसवावी, तसेच ना दुरुस्त असलेली सीमाभिंत तत्काळ बांधण्यात यावी, असे पत्रही वल्लभनगर आगाराकडून बुधवारी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहे. एसटी आगाराने मेट्रोला विविध कामासाठी जागा दिली. त्या बदल्यात मेट्रोकडून आगाराचे सुशोभीकरण केले जाणार आहे. मात्र, त्यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे. परिणामी आगारात राडारोडा पडला आहे.

> 'वल्लभनगर एसटी आगारात दररोज शेकडो बसची ये-जा सुरु असते. रात्री मुक्कामीसुद्धा असतात. त्यामुळे काही गुंड, तळीरामांचा वावर वाढला आहे. त्यामुळे पोलिस नियंत्रण कक्ष सुरु करुन चोवीस तात्र पोलिस कर्मचारी तैनात करावा, आगारात आणखी दहा सीसीटीव्ही बसवण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. महामेट्रोला देखील पत्र देवून त्यांना सीसीटीव्ही बसवण्यास कळवले आहे. तसेच सगळ्या चालक-वाहकांना सूचना देवून बस आगारात लावून खिडक्या, दारे व्यवस्थित बंद करण्याच्या सूचना देणार आहे.
>
> **- वैशाली कांबळे, स्थानक प्रमुख, एसटी आगार, वल्लभनगर**

# पालिकेचे उद्दिष्ट एक हजार कोटी, वसुली 775 कोटींची

## विविध शासकीय मोहिमा, सर्वेक्षण आणि लोकसभा व विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता यामुळे यावर्षी मालमत्ताकर वसुलीवर परिणाम झाला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध शासकीय मोहिमा, सर्वेक्षण आणि लोकसभा व विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता यामुळे यावर्षी मालमत्ताकर वसुलीवर परिणाम झाला आहे. करसंकलने एक हजार कोटी रुपयाच्या वसूलीचे उद्दिष्ट ठेवले होते. परंतू, मंगळवारी (दि.२५) अखेर महापालिकेने ७७५ कोटींची मालमत्ता करवसुली केली आहे.




विविध शासकीय मोहिमा, सर्वेक्षण आणि लोकसभा व विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता यामुळे यावर्षी मालमत्ताकर वसुलीवर परिणाम झाला आहे. करसंकलने एक हजार कोटी रुपयाच्या वसूलीचे उद्दिष्ट ठेवले होते. परंतू, मंगळवारी (दि.२५) अखेर महापालिकेने ७७५ कोटींची मालमत्ता करवसुली केली आहे.

त्यात शास्तीकर माफी, उपयोगिता करही माफ केला आहे. त्यामुळे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी महापालिकेला कसरत करावी लागत आहे. महापालिका हद्दीत भागात सहा लाखांहून अधिक छोट्या-मोठ्या औद्योगिक आस्थापना, उपहारगृहे, इमारती, सदनिका अशा विविध मालमत्ता आहेत. त्यांच्या मालमत्ताकरातून महापालिकेला उत्पन्न मिळते. दरम्यान, महापालिकेने कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्यामुळे शहरातील इतर अनधिकृत बांधकामधारक कर भरत नसल्याचे चित्र आहे. त्याचा फटका महापालिकेच्या करवसुलीला बसत असल्याचे चित्र आहे.

> महापालिकेच्या करसंकलन विभागाचे एक हजार कोटी रुपये वसूल करण्यासाठी करसंकलन विभागाकडून जोरदार कारवाई सुरु आहे. यात महापालिकेचे कर्मचारी व ठेकेदारांनाही मालमत्ता कर भरण्यासाठी आदेश काढले आहेत. कर्मचारी व ठेकेदारांच्या पिंपरी-चिंचवड शहरात राहतात. त्यांच्या शहरात मालमत्ता आहेत. त्यांनीही मालमत्ताकराचा भरणा करावा, असा आदेश काढण्यात आला आहे.
>
> **- प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका**

# शाळा 1 एप्रिल नव्हे; जूनमध्येच सुरू होणार

## शिक्षण आयुक्तांनी येत्या शैक्षणिक वर्षात प्रचलित पद्धतीनुसार शाळा जूनमध्येच सुरु होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचे शिक्षण राज्यमंत्र्यांनी दोनच दिवसांपूर्वी सांगितलेले असताना, शिक्षण आयुक्तांनी मात्र येत्या शैक्षणिक वर्षात प्रचलित पद्धतीनुसार शाळा जूनमध्येच सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

आगामी शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू करण्याचा प्रयत्न असून, याबाबत अधिकाऱ्यांनी समन्वय ठेवून काम सुरू केले आहे,' असे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी नुकतेच पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितले होते. त्यामुळे राज्यभरातील शाळा, पालक, संस्थाचालक, शिक्षक अशा सर्वच घटकांमध्ये याबाबत चर्चा सुरू झाली. अर्थात, त्याचे पुरेसे स्पष्टीकरण न मिळाल्याने या संदर्भात संभ्रमाचेच वातावरण होते.



### पहिलीच्या अभ्यासक्रमात महत्त्वाचे बदल

» दरम्यान, राज्य सरकारने शालेय शिक्षण प्रणाली अधिक आधुनिक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक करण्यासाठी हे बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार होणारा हा अभ्यासक्रम सीबीएसईच्या पद्धतीनुसार असेल. मात्र तो राज्य शिक्षण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार केला जाईल. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाचा लाभ मिळेल. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीतही मदत होईल. महत्त्वाचे म्हणजे, यंदाच्या वर्षापासून शाळा या जूनमध्येच सुरू होणार आहेत. तसेच, पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम लागू होईल, त्यामुळे या सगळ्याबाबत पालक काय प्रतिक्रिया देतील? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या पार्श्वभूमीवर, राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी या बदलांविषयी माहिती देताना सांगितले की, पहिली आणि शक्य झाल्यास दुसरीच्या अभ्यासक्रमात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सुधारणा करण्यात येणार आहे. यासाठी नवी पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. तर अध्यापन पद्धतीत बदल केले जातील. मात्र, याचा परिणाम शाळांच्या वेळापत्रकावर होणार नाही आणि शाळा नेहमीप्रमाणे जूनमध्येच सुरू होतील.

### शालेय शिक्षण विभागाचा खुलासा

» बदलत्या नियमांबाबत स्पष्टीकरण देताना शालेय शिक्षण विभागाने म्हणले आहे की, शाळांचे वेळापत्रक जुनपासूनच सुरू राहणार असून केवळ पहिलीच्या अभ्यासक्रमात बदल होणार आहे. हा अभ्यासक्रम राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार तयार केला जात आहे. जो सीबीएसईच्या धर्तीवर बनवलेला असेल. तसेच, इतर वर्गांसाठी कोणताही बदल होणार नसल्याचे शिक्षण विभागाने सांगितले आहे.

येत्या शैक्षणिक वर्षात प्रचलित वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात येणार नाही. त्यामुळे शाळा जूनपासूनच सुरू होतील. शाळा सुरू करण्याच्या वेळापत्रकात बदल करायचा झाल्यास त्याबाबत सविस्तर चर्चा करणे, तसेच योग्य वेळ देणेही आवश्यक आहे. त्यामुळे सद्यस्थितीत शाळा सुरू करण्याबाबत कोणताही बदल होणार नाही, असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची शालेय स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा विकसित करण्यात आला आहे. त्यात नव्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्याबरोबरच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे (सीबीएसई) शैक्षणिक वेळापत्रक राज्यातील शाळांनाही लागू करण्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील शाळाही १ एप्रिलपासून सुरू करण्याचा मुद्दा चर्चेत आहे.

मात्र, राज्यातील प्रत्येक भागातील स्थिती वेगळी असल्याने प्रचलित वेळापत्रक बदलून १ एप्रिलपासून शाळा सुरू करण्यास विरोध आहे. अद्याप याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही, तसेच शिक्षण विभागानेही शासन निर्णय प्रसिद्ध केलेला नाही. शिक्षण संस्थेच्या या नव्या नियमानमुळे शाळा व्यवस्थापन आणि पालकांमध्ये संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

# शिरूर तालुक्यातील दोन महत्त्वाचे रस्ते अखेर खुले; शेतकऱ्यांना मिळाला मोठा दिलासा

## या निर्णयामुळे शेकडो शेतकऱ्यांना शेतीकामासाठी आणि शेतमाल वाहतुकीसाठी मोठा दिलासा मिळणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील तब्बल जवळपास ४० वर्षे बंद असलेले कवठे येमाई – पांडव करी गणेशनगर ते फाकटे आणि निमगाव म्हाळुंगी – कासारी हे दोन महत्त्वाचे रस्ते अखेर शिरूर तहसिल कार्यालयाच्या विशेष प्रयत्नांमुळे खुले झाले आहेत. या निर्णयामुळे शेकडो शेतकऱ्यांना शेतीकामासाठी आणि शेतमाल वाहतुकीसाठी मोठा दिलासा मिळणार आहे.

कवठे येमाई येथील पांडव करी गणेशनगर ते फाकटे हा १.५ किमी लांबीचा पाणंद रस्ता जवळपास ४० वर्षांपासून अतिक्रमण आणि अडथळ्यांमुळे बंद होता. महसूल प्रशासनाने विशेष पुढाकार घेत अखेर हा



रस्ता खुला केला आहे.

तसेच, निमगाव म्हाळुंगी ते कासारी हा ५ किमी लांबीचा शिवरस्ता तब्बल २५ वर्षांपासून बंद होता. प्रशासनाने आतापर्यंत २ किमी अंतराचा रस्ता मोकळा केला असून उर्वरित ३ किमी लवकरच पूर्ण केला जाणार आहे. रस्ते खुले झाल्याने शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी सोय निर्माण झाली आहे. हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात

> "शासनाच्या आदेशानुसार व प्रांत अधिकारी पुनम अहिरे, तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली हे कामकाज गतीने सुरू असून, उर्वरित शिवरस्ते, पाणंद रस्तेही ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी चर्चा करून लवकरच खुले करण्यात येतील."
>
> - माधुरी बागले, मंडल अधिकारी मलठण, तळेगाव ढमढेरे

महसूल प्रशासनाने मोठी भूमिका बजावली आहे.

या उपक्रमात मंडल अधिकारी माधुरी बागले, मंडल अधिकारी तावरे मॅडम, ग्राम महसूल अधिकारी रामदास आरदवाड, मनिषा राऊत, मनिषा भालेराव, आबासाहेब रूके, संतोष पोटावळे यांसह ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील, तंटामुक्ती समिती आणि शेतकऱ्यांचा मोठा सहभाग होता. लवकरच या भागातील सर्व प्रमुख रस्ते खुले होतील, अशी आशा ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

कवठे येमाई – पांडव करी गणेशनगर ते फाकटे आणि निमगाव म्हाळुंगी – कासारी हे दोन महत्त्वाचे रस्ते अखेर शिरूर तहसिल कार्यालयाच्या विशेष प्रयत्नांमुळे खुले झाले आहेत. या निर्णयामुळे शेकडो शेतकऱ्यांना शेतीकामासाठी आणि शेतमाल वाहतुकीसाठी मोठा दिलासा मिळणार आहे.